सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

## राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई

**८ वा मजला, न्यु एक्सेलसिअर इमारत, ए. के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई ४००००१**

ई-मेल : maharashtra.cetcell@gmail.com वेबसाईट :www.mahacet.org
www.dhepune.gov.in

क्र. राज्य सीईटी कक्ष/ **B.Ed & ELCT - CET 2018**/घोषणा/७३८/२०१८ दिनांक: ०८/०६/२०१८

## बी.एड. सीईटी -२०१८ महत्वाची घोषणा

**विषय :- एमएएच -बी.एड व बी.एड ईएलसीटी सीईटी -२०१८ परीक्षेस विहित वेळेपूर्वी उपस्थित राहणेबाबत उमेदवारांस सूचना**

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत शनिवार दि. ९ जून व रविवार दि. १० जून, २०१८ रोजी एमएएच - बी.एड व बी.एड ईएलसीटी सीईटी २०१८ आयोजित करण्यात आली आहे. परीक्षेसाठी येतांना आवश्यक लेखनसाहित्य व मुळ ओळखीच्या पुराव्यासह, तसेच परीक्षेच्या दिवशी आयोजित मोर्चे, आंदोलने, वाहतूक व्यवस्था विस्कळीत होणे, अतीवृष्टी, सार्वजनिक वाहतूकीचा खोळंबा इ. बाबी लक्षात घेऊन परीक्षेच्या दिवसाच्या कालावधीचे पूर्व नियोजन उमेदवारांनी स्वत:हुन करणे व कोणत्याही परिस्थितीत विहित वेळेपूर्वी पुरेसे अगोदर संबंधित परीक्षा उपकेंद्रांवर उपस्थित राहणे आवश्यक असल्याच्या सूचना उमेदवारांस विविध माध्यमांव्दारे (सर्व साधारण सूचना/ प्रवेश पत्रावरील सूचना/घोषणा/ एसएमएस) यापूर्वीच देण्यात आल्या आहेत.

दिनांक ०८ जून, २०१८ ते ११ जून २०१८ या कालावधीत मुंबईसह राज्यामध्ये विविध ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता हवामान खात्यामार्फत वर्तविण्यात आली आहे. हे लक्षात घेता उमेदवारांनी अधिक काळजी घेऊन विहित वेळेपेक्षा पुरेसा अवधी अगोदर परीक्षा केंद्रांवर पोहोचण्यासाठी नियोजन करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

जेणेकरुन ऐनवेळेस उद्भवू शकणाऱ्या अडचणी टाळता येणे शक्य होईल. विहित वेळेनंतर उपस्थित राहणाऱ्या उमेदवारांना कोणत्याही परिस्थितीत परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

परीक्षेस येताना उमेदवारांनी ओळखीच्या पुराव्यासाठी प्रवेशपत्रावर उल्लेखित किमान कोणतेही एक **"मुळ"** ओळखपत्र सोबत आणणे अनिवार्य आहे. मुळ ओळखपत्राच्या पुराव्या ऐवजी त्याच्या छायांकित प्रती अथवा कलर झेरॉक्स अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा ओळखीचा पुरावा सादर केल्यास तो ग्राह्य धरला जाणार नाही व उमेदवारास परीक्षेस प्रवेश नाकारण्यात येईल याची नोंद घ्यावी.

मुळ ओळखपत्र व फोटो चिटकवलेले प्रवेश पत्र (Hall Ticket) न नेणाऱ्या व परीक्षा केंद्रावर वेळेवर न पोहोचणाऱ्या उमेदवारांना प्रवेश न मिळल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी उमेदवारांची राहिल.

**आयुक्त,**
**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**